**नि.फौ.ख.क्र. १४१/१९९२**
सरकार – वि.- मनोज बावीसकर
**निशाणी क्र. ६**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ -**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – मोहंमद अब्बास मोहंमद साहब नाईकवाडी - फिर्यादी
वय – ६४ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त- रेसुब कर्मचारी,
सध्या रा. - सोलापुर.

**फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २९९ प्रमाणे, सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. यु. पी. ठाकरे यांचे मार्फत सुरु-**

सन १९९२ मध्ये मी आरक्षक या पदावर रेसुब पुणे येथे कार्यरत होतो. दि. २५/११/१९९२ रोजी माझी नेमणुक आरक्षण केंद्र, पुणे येथे होती. त्यावेळी एक व्यक्ती हातात तिकीट घेवुन संशयीतरित्या तेथे फिरत होता. त्याची चौकशी केली असता त्याने सांगितले की, तो हसमुख व अमर ट्रॅव्हल्स करीता तिकीटे काढुन देत असतात. मी त्याने सदरची तिकीटे काढणे गुन्हा असतो असे सांगितल्यावर त्यांनी मला सांगितले की, सदरील कामे ते त्यांच्या साहेबांनी सांगितल्यानुसार करतात. मी तिकीटांचे सर्व माहिती माझे तक्रारीमध्ये दिलेली आहे. आरोपीकडे पुणे ते मुंबई अशी दोन तिकीटे मिळुन आली. त्यानंतर मी त्या व्यक्तीस घेवुन आमचे कार्यालयात आलो व त्यास वरीष्ठांसमोर हजर केले. त्याने त्याचे नाव मनोज बावीसकर असे सांगितले. त्यानंतर मी आरोपी विरुध्द माझी फिर्याद दिली. आता मला सदरची फिर्याद दाखवण्यात आली. ती तीच असुन त्यावर माझी याची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. ७** देण्यात येतो. आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेली दोन तिकीटे पाहिल्यास मी ओळखु शकतो. सदरची तिकीटे मला दाखवण्यात आली. त्यास अनुक्रमे **नि.क्र. ८ व नि.क्र. ९** देण्यात येतो. आरोपीस पाहिल्यास मी ओळखु शकतो. तो आज रोजी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण .**

**आरोपी हा फरार असल्याने उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.08.03 17:09:40 +0530

दि. ०३/०८/२०२६
स्थळ - पुणे

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.